# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## गुरुवार, दिनांक २० जुलै, २०२३
## ( सकाळी ११.०० वाजता )

**एक : प्रश्नोत्तरे**

**(अ)** तारांकित प्रश्न

**(ब)** तारांकित प्रश्नाबाबतची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

**आदिवासी विकास मंत्री** : "**राज्यातील आदिवासी जिल्ह्यांतील बालक अणि माता यांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी नवसंजीवनी योजना सुरु करण्याबाबत**" या विषयावरील श्री.कुणाल पाटील व इतर वि.स.स. यांच्या दिनांक २४ ऑगस्ट, २०२२ रोजी उत्तरीत झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक ४४७८५ च्या अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**दोन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**तीन : शुक्रवार, दिनांक २१ जुलै, २०२३ रोजीच्या अशासकीय कामकाजाबाबत घोषणा**

**चार : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

(१) **श्री. अशोक चव्हाण, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"सर्वसामान्य जनतेला प्रवासाच्या सोयीसाठी उभारण्यात आलेल्या राज्यातील सध्या अस्तित्वात असलेल्या १८ विमानतळांपैकी सद्य:स्थितीत केवळ सातच विमानतळ विमान प्रवाशांसाठी उपलब्ध असणे, आंतरराष्ट्रीयदृष्ट्या महत्वाच्या असलेल्या मुंबई विमानतळावरुन राज्यातील नागपूर, औरंगाबाद, सिंधदुर्ग आणि कोल्हापूर वगळता इतर कोणत्याही शहरामध्ये जाण्यासाठी विमानसेवा उपलब्ध नसणे, मात्र याच मुंबई विमानतळावरुन शेजारच्या गुजरात राज्यातील अहमदाबादकरीता १७, राजकोट करिता ३, तर वडोदरासाठी २ उड्डाणे उपलब्ध असणे, परंतु महाराष्ट्र राज्यात विमानतळ उपलब्ध असूनही विमान सेवा उपलब्ध नसणे, राज्यातील बहुतांश विमानतळांवर रात्री विमाने उतरविण्याची सोय नसणे, आणीबाणीच्या प्रसंगी अत्यावश्यक म्हणून सुरक्षा

व्यवस्था तसेच एअर ॲॅम्ब्युलन्स सेवांसाठी २४ तास विमानतळ सज्ज ठेवणे अपेक्षित असणे, आजच्या युगात विमान प्रवास ही केवळ चैनीची गोष्ट राहीली नसून वेळ वाचविण्याकरीता उद्योजकांबरोबरच सर्वसामान्य प्रवाशांकडून विमान प्रवासाचा पर्याय निवडला जाणे, मात्र, मराठवाडयामध्ये औरंगाबाद वगळता अन्य कोणत्याही जिल्ह्यात विमानतळ नसणे, राज्यातील विमानसेवा उपलब्ध नसलेले बहुतांश विमानतळ वापराअभावी दुर्लक्षित / ना-दुरुस्त असणे, सध्या नांदेड-बारामती-लातुर-उस्मानाबाद ही विमानतळ रिलायन्स लिमिटेड या कंपनीला दिलेली असणे, मात्र सदर कंपनीने आर्थिक दिवाळखोरी जाहीर केल्यामुळे व कंपनी विमानतळाची सेवा, देखभाल व दुरुस्ती करण्यास असमर्थ असल्यामुळे सध्या बंद असलेली विमानसेवा तात्काळ नव्याने सुरु करण्यासाठी निविदा काढून नविन कंपनीची नियुक्ती करण्याची आवश्यकता असणे, सध्याच्या गतीमान काळात राज्यातील जास्तीत जास्त शहरे विमान सेवेने एकमेकांना जोडण्याची आवश्यकता असणे, मात्र शासनाच्या उदासिनतेमुळे राज्यातील शहरांना जोडणारी विमान सेवा उपलब्ध नसल्यामुळे राज्यातील नागरिकांना १२ ते १४ तासांचा शारिरीक व मानसिक दृष्ट्या थकविणारा प्रवास करुन दुसऱ्या शहरांपर्यंत जावे लागणे, मुंबईसारख्या आंतरराष्ट्रीय शहरामधून अन्य राज्यातील प्रवाशांकरिता मोठ्या प्रमाणावर विमानसेवा उपलब्ध असणे, मात्र, राज्यातील नागरिकांनाच अशी सुविधा उपलब्ध नसल्यामुळे राज्यातील उद्योजक, व्यावसायीक तसेच, सर्वसामान्य नागरीकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व नाराजी यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भुमिका."

**(२) सर्वश्री. रवींद्र धंगेकर, संजय जगताप, बाळासाहेब थोरात, नाना पटोले, अमीन पटेल, अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, प्रा.वर्षा गायकवाड, सर्वश्री. संग्राम थोपटे, सुनिल केदार, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), सर्वश्री. बळवंत वानखडे, कुणाल पाटील, कु.प्रणिती शिंदे, डॉ.विश्वजित कदम, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील निवासी इमारतीमधील ५०० चौ. फूटपर्यंत चटईक्षेत्र असलेल्या सदनिकांना मालमत्ता कर संपूर्णपणे माफ करण्याचा निर्णय तत्कालीन मा.मुख्यमंत्री महोदयांनी सन २०२१ मध्ये घेतलेला असणे, या धर्तीवरच नवी मुंबई महानगरपालिकेतील ५०० चौ.फूट पर्यंतच्या घरांना मालमत्ता कर माफ करण्यासाठी महानगरपालिकेला शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याचे आदेश माहे जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास दिले असणे, यामुळे या पालिकेच्या हद्दीतील १ लाख ९८ हजार सदनिकाधारकांना याचा फायदा होणार असणे, याचप्रमाणे पुणे शहरात मोठया प्रमाणात सर्वसामान्य नोकरदार व मध्यमवर्गीय वर्ग ५०० चौ.फूट अथवा त्यापेक्षा कमी जागेत राहत असून त्यांना मालमत्ता कर भरणे अत्यंत जिकीरीचे होत असणे, मुंबईच्या धर्तीवर पुणे महानगर क्षेत्रातील ५०० चौ.फूट किंवा त्यापेक्षा कमी जागेत असलेल्या सदनिकांना मालमत्ता करांतून मुक्त करण्यात यावे, म्हणून माहे मे, २०२३ मध्ये वा

त्यासुमारास लोकप्रतिनिधींने शासनाला निवेदन देऊन मागणी केलेली असणे, परंतु या निवेदनावर शासनाने कोणतीही कार्यवाही केलेली नसणे, यामुळे पुणे शहरातील जनतेमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, जनतेला न्याय मिळण्यासाठी शासनाने तातडीने निर्णय घेऊन पुणे शहरात ५०० चौ. फूटांपर्यंत घरांना संपूर्ण कर माफ करण्यासाठी शासनाने याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**पाच : शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ :-**

सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५ – महाराष्ट्र पशु आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२३

**(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(१) (क)** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री नाना पटोले, बाळासाहेब थोरात, संजय जगताप, सुरेश वरपुडकर, अमिन पटेल, अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, संग्राम थोपटे, प्रा.वर्षा गायकवाड, ॲड यशोमती ठाकूर, सर्वश्री बळवंत वानखडे, सुभाष धोटे, शिरीष चौधरी, कुणाल पाटील, मोहनराव हंबर्डे, रविंद्र वायकर व भास्कर जाधव, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०२३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४ - महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा अध्यादेश, २०२३ नापसंत करते."

**(ख) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ - महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा विधेयक, २०२३**

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ – महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, जितेश अंतापूरकर, नाना पटोले, संजय जगताप, बळवंत वानखडे, विकास ठाकरे, शिरीष चौधरी व अमिन पटेल, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ – महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.रविंद्र वायकर व भास्कर जाधव, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ – महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२) (क)** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री नाना पटोले, बाळासाहेब थोरात, संजय जगताप, सुरेश वरपुडकर, अमिन पटेल, अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, संग्राम थोपटे, प्रा.वर्षा गायकवाड, ॲड यशोमती ठाकूर, सर्वश्री बळवंत वानखडे, सुभाष धोटे, शिरीष चौधरी, कुणाल पाटील, मोहनराव हंबर्डे, रविंद्र वायकर व भास्कर जाधव, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०२३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६ - महाराष्ट्र (ग्रामपंचायतींच्या, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या विवक्षित निवडणुकांकरिता) वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत तात्पुरती वाढविणे अध्यादेश, २०२३ नापसंत करते."

**(ख) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २३ – महाराष्ट्र (ग्रामपंचायतींच्या, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या विवक्षित निवडणुकांकरिता) वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत तात्पुरती वाढविणे विधेयक, २०२३**

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २३ – महाराष्ट्र (ग्रामपंचायतींच्या, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या विवक्षित निवडणुकांकरिता) वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत तात्पुरती वाढविणे विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, जितेश अंतापूरकर, नाना पटोले, संजय जगताप, बळवंत वानखडे, विकास ठाकरे, शिरीष चौधरी व अमिन पटेल, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २३ – महाराष्ट्र (ग्रामपंचायतींच्या, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या विवक्षित निवडणुकांकरिता) वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत तात्पुरती वाढविणे विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.रविंद्र वायकर व भास्कर जाधव, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २३ – महाराष्ट्र (ग्रामपंचायतींच्या, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या विवक्षित निवडणुकांकरिता) वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत तात्पुरती वाढविणे विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(३) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४ – महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) विधेयक, २०२३**

---

**(बुधवार, दिनांक १९ जुलै, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सहा : डॉ.किरण लहामटे, सर्वश्री रणधीर सावरकर, सदा सरवणकर, बाबासाहेब पाटील, डॉ.संजय कुटे, सर्वश्री चिमणराव पाटील, दिलीप मोहिते-पाटील, जयकुमार रावल, राजेंद्र पाटणी, भरतशेठ गोगावले, प्रकाश सोळंके, अभिमन्यू पवार, राजेश पवार, संजय शिरसाठ, दत्तात्रय भरणे, श्रीमती श्वेता महाले, सर्वश्री आकाश फुंडकर, प्रताप सरनाईक, यशवंत माने, समीर कुणावार, तुषार राठोड, संजय रायमुलकर, दौलत दरोडा, हरिष पिंपळे, श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री संग्राम जगताप, प्रकाश भारसाकळे, हरिभाऊ बागडे, मंगेश कुडाळकर, शेखर निकम, सर्वश्रीमती देवयानी फरांदे, सीमा हिरे, सर्वश्री प्रकाश आबिटकर, बाळासाहेब आजबे, सर्वश्री सचिन कल्याण-शेट्टी, ज्ञानराज चौगुले, संजय गायकवाड, ॲड. शहाजीबापू पाटील, श्रीमती नमिता मुदंडा, सर्वश्री अनिल बाबर, सुहास कांदे, श्रीमती यामिनी यशवंत जाधव, श्री.संभाजी निलंगेकर-पाटील, श्रीमती लताबाई सोनावणे, ॲड आशिष जयस्वाल, सर्वश्री रमेश बोरनारे, समाधान आवताडे, दादाराव केचे, जयकुमार गोरे, राम सातपुते, सुभाष देशमुख, सुरेश भोळे, किर्तीकुमार बांगडीया, प्रशांत बंब, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री संताष दानवे, विनोद अग्रवाल, प्रकाश आवाडे, रत्नाकर गुट्टे, संतोष बांगर, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"अल निनोचा प्रभाव, सरासरीपेक्षा पाऊस कमी होण्याची शक्यता व उशिराने झालेले पावसाचे आगमन, यामुळे राज्यातील शेतकऱ्यांवर दुबार वा तिबार पेरणीची वेळ येण्याची शक्यता लक्षात घेऊन शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करण्याची भूमिका शासनाने घेतली असणे, याबाबतच्या उपाययोजना युध्दस्तरावर करण्याची आवश्यकता असणे, राज्यातील बहुतांश लोकांचे जीवन कृषी क्षेत्राशी निगडित असल्याने शेती हे अन्नधान्य, रोजगार व उपजीविकेचे साधन असणे, राज्यातील शेतकरी समर्थ व स्वावलंबी व्हावा, यासाठी शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून शेतीचे उत्पादन व शेतकऱ्यांचा आर्थिक विकास या धोरणाला विद्यमान शासनाने परमोच्च स्थान दिले असणे, शेतकरी स्वयंनिर्भर व्हावा या उद्देशाने विविध नवनव्या योजना विद्यमान शासनाने हाती घेतल्या असणे, जलसंधारणाच्या सर्वाधिक योजना यशस्वीपणे राबविण्यात महाराष्ट्र हे देशात प्रथम क्रमांकाचे राज्य ठरले असणे, पाणी अडवून, जमिनीत जिरवणे गरजेचे असल्याने जलयुक्त शिवार योजना टप्पा २ राबवण्याचा निर्णय सरकारने घेतला असून ५४५ कोटी रुपयांची तरतूद केली असणे, अर्थसंकल्पातील "पंचामृत" संकल्पनेत "शाश्वत शेती - समृध्द शेतकरी " हे प्रथम अमृत असून त्याअनुषंगाने राज्यातील पीक विमा योजना व्यापक प्रमाणात राबविली जात असणे, कृषी क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढविणे, गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना पुढे सुरु ठेवणे, पशुजैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे येथे लम्पी चर्मरोग प्रतिबंधक लस निर्मिती सुरु करणे, छत्रपती शिवाजी महाराज

शेतकरी सन्मान योजनेच्या उर्वरित पात्र शेतकऱ्यांना त्यांचे लाभ देणे, उत्पन्न वाढीसाठी कोकणात काजू बोंड प्रक्रिया केंद्रे स्थापन करणे, कृषी व संलग्न क्षेत्रातील अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे उपयोजन व प्रसारण करण्यासाठी नागपूर येथे डॉ.पंजाबराव देशमुख कृषी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय कृषी सुविधा केंद्र स्थापन करणे, नागपूर, काटोल, कळमेश्वर, बुलढाणा इ.जिल्ह्यात आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्र उभारणे इ.धोरणे कार्यान्वीत करण्यात आली असणे, हळद पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी हिंगोली जिल्ह्यात "बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्यात आली असणे, शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी "मिशन २०२५ "कार्यक्रम हाती घेतला असणे व त्याअंतर्गत पुढील ३ वर्षात ३० टक्के कृषी वीज वाहिन्यांचे सौरऊर्जीकरण अपेक्षित असणे, संयुक्त राष्ट्र संघाच्या घोषणेस अनुसरून राज्यात महाराष्ट्र पौष्टिक तृणधान्य अभियान राबविण्यात येणे, शेतकऱ्यांच्या घरी जाऊन गोवंश पशुधनाचे संपूर्णतः मोफत प्रतिबंधात्मक लसीकरण करण्यात येणे, नमो शेतकरी महासन्माननिधी योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून शेतकऱ्यांना मिळणाऱ्या प्रति शेतकरी व प्रतिवर्षी ६ हजार रुपयात राज्य सरकारने आणखी ६ हजार रुपयांची भर घातली असणे, महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्त योजनेअंतर्गत नियमित पीक कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत राज्य शासनाकडून प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणे, पंतप्रधान पीक विमा योजनेच्या हप्त्याचा भार शेतकऱ्यांवर पडू नये, यासाठी शेतकरी हिश्याचा भार उचलण्याचा व शेतकऱ्यांना फक्त १ रुपयात पीक विमा उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेतला असणे, शेतीच्या शाश्वत विकासासाठी महाकृषी विकास अभियान राबविण्यात येणे, "मागेल त्याला शेततळे" योजनेच्या धर्तीवर "मागेल त्याला फळबाग, ठिबक सिंचन, शेततळ्याचे अस्तरीकरण, शेडनेट, हरितगृह, आधुनिक पेरणी यंत्रे व कॉटन श्रेडर" हे घटक उपलब्ध करण्यात येणे, महाराष्ट्रातील काजूच्या सर्वंकष विकासासाठी "काजू फळपिक विकास योजना" लागू करण्याचा निर्णय सरकारने घेतला असणे, अमरावती येथे महत्वाकांक्षी प्रधानमंत्री मेगा इंटिग्रेटेड टेक्सटाईल रीजन अँड अपेरल (PM MITRA) पार्कचे लोकार्पण नुकतेच झाले असणे, विदर्भ, मराठवाड्यासह राज्यातील कापूस उत्पादकांना उत्पन्नवाढीची संधी मिळणार असणे, तसेच, या प्रकल्पामुळे राज्यात गुंतवणूक व रोजगार निर्मितीत मोठी भर पडणार असणे, गोपीनाथ मुंडे शेतकरी सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना राज्यात राबवून अपघातग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयास २ लाख रुपयांपर्यंत सानुग्रह अनुदान देणे, नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याकरिता माहिती तंत्रज्ञानाची मदत घेऊन मोबाईलद्वारे ई-पंचनामा करण्याची प्रक्रिया राबविण्यात येणे, देशी गोवंशाचे संवर्धन, संगोपन व संरक्षण होण्याकरिता महाराष्ट्र गोसेवा आयोगाची स्थापना करण्यात आली असणे, या आयोगाच्या माध्यमातून "गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजना" आणि "गोमाई मूल्यवर्धन योजना" या योजना राबविण्याचे प्रस्तावित असणे, राजे यशवंतराव होळकर महामेष योजनेअंतर्गत मेंढी पालनासाठी भरीव निधीची तरतूद केली असणे, प्रकल्पबाधित मच्छीमारांना नुकसान भरपाई देण्यासाठी व मच्छीमार कुटुंबीयांच्या कल्याणासाठी प्रकल्पाच्या २% किंवा कमाल ५ कोटी रकमेचा मत्स्य विकास कोष स्थापन करण्यात येणे, मच्छीमारांना डिझेल अनुदानासाठी असलेली यांत्रिक नौकेच्या कमाल १२० अश्वशक्तीच्या इंजिनाची मर्यादा काढल्याने सुमारे ८५

हजारापेक्षा अधिक मच्छीमारांना या योजनेचा लाभ मिळणे, केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषी सिंचन योजने अंतर्गत २७ प्रकल्पांना आणि बळीराजा जलसंजीवनी योजने अंतर्गत ९१ प्रकल्पांना मंजुरी देण्यात येणे, परिणामी अनुक्रमे ३ लाख २७ हजार हेक्टर सिंचन क्षमता आणि १ लाख ७३ हजार हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली असणे, शेत जमिनीचा ताबा आणि मालकी हक्क मिळविताना होणारे आपापसातील वाद मिटविताना जमिनीच्या अदलाबदल दस्तावरील मुद्रांक शुल्कात कपात करून ते नाममात्र एक हजार रुपये आणि नोंदणी शुल्क एक हजार रुपये करण्यासंदर्भात "सलोखा योजना" राबविण्यात येणे, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना आणि विविध विभागीय योजनांचे अभिसरण करून 'सुविधा संपन्न कुटुंब मिशन' आणि 'सर्वांगीण ग्राम संस्कृती योजना' राबविण्यात येणे, प्रशासनातील अधिकारी व पदाधिकारी यांनी संपूर्ण एक दिवस शेतकऱ्यांसोबत राहून शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेण्यासाठी 'माझा एक दिवस, माझ्या बळीराजासाठी' हा उपक्रम राबविण्यात येणे, पूरक व्यवसाय म्हणून मोठ्याप्रमाणावर शेतकरी दूध उत्पादनाकडे वळले असणे, अशा शेतकऱ्यांच्या बाबतीत मदतीची भूमिका घेऊन शासनाने दूध दर वाढविण्याबाबत निर्णय घेतला असणे, शासनाच्या या योजनांचा तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत लाभ मिळण्यासाठी या योजना अधिक कार्यक्षम करण्याची व त्यायोगे महाराष्ट्राला अधिकाधिक समृद्धीकडे नेण्यासाठी 'एकमेका सहाय्य करु, अवघे धरू सुपंथ' या उक्तीप्रमाणे करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**सात : म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

**सर्वश्री बाळासाहेब थोरात, जयंत पाटील, अजय चौधरी, अशोकराव चव्हाण, भास्कर जाधव, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री सुनिल प्रभू, नाना पटोले, राजेश टोपे, पृथ्वीराज चव्हाण, रविंद्र वायकर, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री प्राजक्त तनपुरे, राजन साळवी, विजय वडेट्टीवार, अनिल देशमुख, सुनिल राऊत, ॲड. के.सी.पाडवी, सर्वश्री प्रकाश फातर्पेकर, सुनिल केदार, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री अस्लम शेख, वैभव नाईक, प्रा. वर्षा गायकवाड, श्री. संजय पोतनीस, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री रमेश कोरगावकर, अमिन पटेल, कैलास घाडगे-पाटील, अमित देशमुख, नितीन देशमुख, सुरेश वरपुडकर, उदयसिंग राजपूत, रणजीत कांबळे, श्रीमती ऋतुजा लटके, श्री. संग्राम थोपटे, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री कैलास गोरंट्याल, अमित झनक, कुणाल पाटील, शिरीष चौधरी, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री सुभाष धोटे, माधवराव जवळगावकर-पाटील, पी.एन. सडोलीकर-पाटील, डॉ.विश्वजीत कदम, सर्वश्री शिरीषकुमार नाईक, राजेश एकडे, बळवंत वानखडे, राजू पारवे, विकास ठाकरे, सहसराम कोरोटे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री मोहनराव हंबर्डे, हिरामण खोसकर, झिशान सिध्दीकी, संजय जगताप, लहु कानडे, धीरज देशमुख, ऋतुराज पाटील, राजू आवळे, विक्रमसिंह सावंत, जितेश अंतापूरकर, श्रीमती जयश्री जाधव, श्री.रविंद्र धंगेकर वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"राज्यात सातत्याने होणारा खातेबदल, कामाच्या विभागांकडे मंत्र्यांचे होत असलेले दुर्लक्ष, एकाच मंत्र्याकडे एकाहून अधिक जिल्ह्यांच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी असणे, त्या माध्यमातून राज्याच्या विकासाला खीळ बसणे, राज्यात शेतकऱ्यांचे आत्महत्येचे प्रमाण लक्षणीय असणे, शासनाने विधानसभेत स्पष्ट आश्वासन देऊनही राज्यातील हजारो शेतकऱ्यांना अद्यापही कर्जमाफी आणि प्रोत्साहनपर रकमेचा लाभ न मिळणे, बोगस बी-बियाणे व खते विक्रीचे रॅकेट कार्यरत असूनही त्यावर गांभीर्याने कारवाई न होणे. राज्यातील नदी-नाल्यांचे खोलीकरण, रुंदीकरण व साखळी बंधाऱ्यांची कामे घेण्याची आवश्यकता, क्षतिग्रस्त तलावांसह सध्या कार्यान्वित असलेले सिंचन प्रकल्प निधीअभावी रखडणे, "शासन आपल्या दारी" उपक्रमाच्या माध्यमातून ऑनलाईन सुविधा ऑफलाईन देऊन त्याला राजकीय स्वरुप देणे, जनतेस त्याचा काहीही फायदा न होणे व कार्यक्रमाची जाहिरात व अंमलबजावणीसाठी अब्जावधी रुपयांचा वारेमाप खर्च होणे, तत्कालीन विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजी महाराज नगर (औरंगाबाद) यांनी शेतकऱ्यांना सहाय्यभूत अनेक शिफारशी करणे, मात्र त्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे शासनाच्या भूमिकेबाबत नाराजीची भावना निर्माण होऊन त्यांनी मुदतपूर्व सेवानिवृत्ती घेणे, मागील सरकारने मंजूर केलेल्या समृद्धी महामार्गाचाच भाग असलेल्या जालना नांदेड महामार्गचे काम कुर्मगतीने सुरु असणे, जमिनी गेलेल्या शेतकऱ्यांना भूसंपादनाचा योग्य मोबदला न मिळणे, नांदेड-लातूर रेल्वे मार्गाचा प्रस्ताव अद्यापही तयार न होणे, मराठवाड्यामध्ये बूलेट ट्रेन प्रकल्प आणण्याकरिता शासन उदासीन असणे, हिंगोली सारख्या "ना उद्योग" भागातील सहकारी साखर कारखान्यांना पॅकेज स्कीम इन्सेंटिव अंतर्गत मिळणाऱ्या सवलती काढून घेणे, विमानतळांचा विकास व अद्यावतीकरणाबाबत शासन उदासीन असणे, राज्यभर विमानतळे उपलब्ध असूनही निवडक शहरे वगळता इतरत्र विमानसेवा सुरू नसणे, मनमाड औरंगाबाद परभणी रेल्वेच्या दुपदरीकरणास सुरुवातही न होणे, नाशिक-पुणे रेल्वेमार्गाचे काम खोळंबणे मराठवाडा व विदर्भात नवीन उद्योग व गुंतवणूक आणण्याबाबत शासनाच्या उदासीनतेमुळे बेरोजगारी व आत्महत्यांचे प्रमाण वाढणे, राज्यातील औद्योगिक प्रकल्प बाहेर जाणे, पाण्याच्या उपलब्धतेचा विचार न करता घाईगडबडीने वॉटर ग्रीडची संकल्पना राबविणे, बाभळी धरणातून वाहून जाणारे पाणी अडवण्यासाठी तेलंगणा राज्याच्या सहमतीने सर्वोच्च न्यायालयाकडे संदर्भ न करणे, पश्चिमवाहिनी नद्यांचे पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याची आवश्यकता असणे, शासकीय रुग्णालये व महाविद्यालयांची झालेली दुरवस्था वैद्यकीय अधिकारी/ कर्मचाऱ्यांची पदे न भरल्यामुळे रुग्णांची होत असलेली गैरसोय, एसईबीसी मधून ईडब्ल्यूएसचा विकल्प दिलेल्या मराठा उमेदवारांच्या नियुक्तीचे प्रकरण उर्जा विभागाकडे मागील दोन महिन्यांपासून प्रलंबित असणे, वैधानिक विकास मंडळांच्या पुनरुज्जीवनाबाबत केंद्र शासनाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावाचा पाठपुरावा न केल्यामुळे मागास भागात मोठ्या प्रमाणात निर्माण झालेला अनुशेष, जातीचे प्रमाणपत्र वेळेत मिळण्यात होत असलेली अक्षम्य दिरंगाई, परिणामी जनमानसात पसरलेला तीव्र असंतोष, मराठा व इतर आरक्षणाच्या संदर्भात प्रचंड मोर्चे, उपोषणे, आत्महत्या करुनही या बाबीकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, शासनाच्या विविध योजनांना लाभ व्हावा म्हणून ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची सोय असणे, असे अर्ज करीत असताना संपूर्ण दिवसभर सर्व्हर डाऊन राहत असल्याने केवळ एका

अर्जासाठी संपूर्ण दिवस वाया जाणे, शासनाच्या विविध विभागातील पद भरती करीता आयोजित करण्यात येत असलेल्या परिक्षांचे शुल्क अत्यंत जास्त असल्याने गरीब कुटुंबातील परिक्षार्थीना शुल्क भरण्यात अडचणी येणे, केवायसीच्या नावाखाली अतिवृष्टी व पावसाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना अनुदान न मिळणे, ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या आशा सेविकांच्या पगारवाढीचा प्रश्न प्रलंबित असून काही महिन्यांपासून त्यांना पगारही न मिळणे, राज्याची ढासळलेली अर्थव्यवस्था, रोजगार देण्याची संधी असतानाही राज्यातील विविध विभागाअंतर्गत रिक्त असलेल्या २ लाख ४० हजार जागा न भरणे, ठराविक सदस्यांनाच विकास कामासाठी निधी उपलब्ध होत असल्याने समतोल विकासाच्या संकल्पनेला बसलेली खीळ, महाविकास आघाडी सरकारच्या काळातील कामांना दिलेली स्थगिती अद्यापही न उठविल्यामुळे जनमानसात निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**आठ : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(मंगळवार, दिनांक १८ जुलै, २०२३ रोजीच्या बॅलटव्दारे ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आलेल्या सूचना) (क्रमांक १ व २)**

**(१) श्री. अमिन पटेल, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबईमध्ये नोंदणीकृत सरकारी तसेच खाजगी रुग्णालयांची संख्या १३०० हून अधिक असणे, या रुग्णालयांव्यतिरिक्त अनेक बेकायदा रुग्णालये मुंबईमध्ये आढळून येणे, बेकायदा रुग्णालयांचे सर्वाधिक प्रमाण मानखुर्द, गोवंडी, शिवाजीनगर परिसरात असणे, काही रुग्णालये अतिशय चिंचोळ्या गल्लीत असून दुर्दैवाने आगीची घटना घडल्यास तेथे आगीचे बंब पोहोचण्यास अडथळे निर्माण होणे, मुंबईमधील अनेक खाजगी, सार्वजनिक रुग्णालये आणि नर्सिंग होम यांचे फायर ऑडीट न होणे, या रुग्णालयांमध्ये औषधांचा तुटवडा असणे, अनेक वैद्यकीय चाचण्या बाहेरुन करुन घेण्यावर या रुग्णालयांचा भर असणे, या रुग्णालयांमध्ये सोयीसुविधांचा अभाव असणे, त्यामुळे रुग्णांच्या जीवास धोका निर्माण होणे, खर्चिक वैद्यकीय सेवेमुळे रुग्ण खचून जाणे, रुग्णालयांना आग लागण्याचे प्रमाण वाढत असणे, विनापरवाना खाजगी रुग्णालये, नर्सिंग होम राजरोसपणे चालू असणे, या रुग्णालयांवर कोणतीही कार्यवाही न होणे, परिणामी रुग्णांची होणारी आर्थिक छळवणूक व त्यांच्या नातेवाईकांमध्ये पसरत असलेला असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२) श्री. रविंद्र वायकर, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"जोगेश्वरी विधानसभा क्षेत्रातील आरे वसाहतीमधील २७ आदिवासी पाडयांना जोडणाऱ्या जवळपासस ४५ कि.मी. लांबीच्या अंतर्गत रस्त्यांची दुरूस्ती गेल्या कित्येक वर्षांपासून करण्यात आलेली नसणे, सदरहू रस्त्यांच्या दुरूस्तीकरिता एम.डी.आर अंतर्गत निधी उपलब्ध करून देण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी सन २०२० पासून सातत्याने मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना निवेदने सादर केलेली असणे, देखभाल दुरूस्तीअभावी या रस्त्यांची मोठया प्रमाणात दुरवस्था झालेली असून या रस्त्यांवर पथदिवेही नसल्याची बाब निदर्शनास आलेली असणे, पथदिव्यांअभावी असणाऱ्या अंधारामुळे मागील काही महिन्यात या ठिकाणी बिबट्याचा संचार वाढला असून बिबट्याने हल्ला केल्याच्या ७-८ घटना घडलेल्या असणे, यात (१) ४ ऑक्टोबर, २०२२ हिमांशू अवधेश यादव (वय ५ वर्ष) आदर्श नगर, (२) २४ ऑक्टोबर, २०२२ कुमारी इकीता लोट, युनिट नं. १५ (वय १.५ वर्ष - मयत), (३) ११ नोव्हेंबर, २०२२ श्रीमती संगीता गुरव, आदर्श नगर. या प्रकरणी पथदिवे सुरू करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे सप्टेंबर तसेच डिसेंबर, २०२१ तसेच माहे जुलै व नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे दुग्ध वसाहत यांना निवेदनही दिलेले असणे, रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे व पथदिवे बंद असल्यामुळे या भागातील आदिवासी नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत, रात्री अपरात्री वैद्यकीय सुविधेसाठी जाण्याकरिता अनेक अडचणींचा सामना करावा लागत असून वेळप्रसंगी नागरिकांना वेळेवर उपचार न मिळाल्याने जीवही गमवावा लागत असणे, सदरहू रस्त्यांच्या देखभाल दुरूस्तीअभावी व पथदिवे बंद असल्याने स्थानिक आदिवासी नागरिकांना होत असलेला त्रास व या रस्त्यांच्या दुरूस्तीकरिता प्राप्त होणारा निधी लक्षात घेता सदरहू रस्ते हे बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्याबाबत तसेच रस्त्यांच्या विकास व दुरुस्तीकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे वारंवार लेखी निवेदनाव्दारे मागणी केलेली असणे, परंतू अद्यापही या प्रकरणी शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नसणे, केवळ रस्त्यांच्या दुरूस्तीच्या नावाखाली तुटपुंज्या निधीची उपलब्धता शासनाकडून करण्यात येत असल्याने या रस्त्यांच्या दुरवस्थेत दिवसेंदिवस वाढ होत असणे, सदरहू रस्ते बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करणे शक्य नसल्यास, सदरहू रस्त्यांची मालकी ही शासनाकडेच ठेवून केवळ देखभाल दुरूस्तीकरिता सदरहू रस्ते बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्याबाबत स्थानिक नागरिकांकडून मागणी करण्यात येणे, आरे क्षेत्रामधील अंतर्गत रस्त्यांच्या सिमेंट काँक्रीटीकरणाच्या कामांकरिता १७३ कोटीच्या निधीची आवश्यकता असतांना अंतर्गत रस्त्याच्या डांबरीकरणासाठी रुपये ४८ कोटी खर्चाच्या प्रस्तावास सार्वजनिक बांधकाम विभागाव्दारे तांत्रिक मान्यता देण्यात आली असणे, परंतु येत्या दोन वर्षात मुंबईतील

रस्त्यांचे सिमेंट काँक्रिटीकरण करण्यासाठी मुंबई महापालिकेने सहा हजार कोटीचे बजेट केलेले असणे, मुंबईच्या रस्त्याकरिता शासन ६०० हजार कोटीच्या निधीची तरतुद करत असतांना आरे क्षेत्रातील आदिवासी पाडयांमधील अंतर्गत रस्त्यांच्या कॉंक्रिटीकरणाकरिता १७३ कोटीच्या निधीची तरतूद करण्यास असमर्थता दर्शविणे, आरे क्षेत्रातील अंतर्गत रस्त्यांच्या कॉंक्रिटीकरणाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी सातत्याने पाठपुरावा करुनही शासन स्तरावर कोणतीच दखल घेतली जात नसणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १९ जुलै, २०२३

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा